शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

# भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप





कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे
## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. २३१९-६०२५

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

• **अतिथी संपादक** •

प्रा. डॉ. अरुण शिंदे

• **संपादन सहाय्य** •

प्रा. डॉ. निलेश शेळके । प्रा. डॉ. बळवंत मगदूम । प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ

**पत्रिका संपादक मंडळ**

• **संपादक** •

प्रा. डॉ. नंदकुमार मोरे

• **सदस्य** •

प्रा. डॉ. देवानंद सोनटक्के । प्रा. डॉ. जयवंत दळवी । प्रा. डॉ. सुभाष पाटील

• **प्रकाशक** •

प्रा. डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,
ता.जि. सातारा ४१५५१९

• **मुद्रक** •

भारती मुद्रणालय
८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.
फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि. सातातरा ४१५५१९ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

१०३ **डिजिटल माध्यमे आणि मराठी भाषेचे बदलते स्वरूप** / प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने ............ २८६
१०४ **पत्रकारिता : भाषिक कौशल्य** / डॉ. अनुसया नागनाथ नागीमे ............ २८८
१०५ **'तृष्णा' या आदिवासी आत्मकथनातील भाषावैभव** / प्रा.डॉ. कल्पना डी. गोरले-थोरात ............ २९०
१०६ **लोकसाहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास** / प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे ............ २९४
१०७ **भाषा, बोली आणि संस्कृती सहसंबंध** / साधना अरुण खोमणे ............ २९७
१०८ **मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध** / डॉ. केशव धोंडिबा टिपरसे ............ २९९
१०९ **'मोराची बायको' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखांचा मानसशास्त्रीय अभ्यास** / निलम नंदलाल अडसुळे............ ३०१
११० **बालसाहित्य आणि बालगीतांतून प्रकट होणारे भावविश्व** / डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार ............ ३०३
१११ **अभिजात मराठीचे लेखन** / प्रा.डॉ.प्रवीण चंदनशिवे ............ ३०६
११२ **चित्रपट भाषा : एक अभ्यास** / प्रा.डॉ. विठ्ठल पंढरीनाथ लंगोटे ............ ३०८
११३ **आदिवासींच्या 'दंडार' उत्सवातील लोकगीतांमधून आविष्कृत होणारे समाजजीवन** /
राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे, मार्गदर्शक : प्रा.डॉ.संजय केशवराव लाटेलवार ............ ३१०
११४ **अध्यात्मिक शाहिरी : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र** / प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ............ ३१४
११५ **मराठी भाषा आणि अन्य भाषांचा परस्परसंबंध** / प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील ............ ३१७
११६ **शासकीय कामकाजातील कार्यालयीन भाषा व भाषा धोरण** / डॉ. संतोष शहापूरकर ............ ३२०
११७ **मराठी भाषा विकासाची आव्हाने आणि उपाय** / डॉ. रविकांत शिंदे ............ ३२२
११८ **मराठी भाषा, साहित्य व खेळ** / डॉ. लोहिता माने ............ ३२६
११९ **इंग्रजी भाषांतरित 'फकिरा' कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास** / डॉ. वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव ............ ३२८
१२० **मानवी विकास आणि भाषा उत्पत्ती** / प्रांजली सत्यवान क्षीरसागर ............ ३३१
१२१ **मराठी कवितेचा राजकीय परिप्रेक्ष्य** / डॉ. बळवंत मारुती मगदूम ............ ३३५
१२२ **मराठी भाषा आणि सोशल नेटवर्किंग** /
श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे, मार्गदर्शक : डॉ. तानाजी अंबादास देशमुख ............ ३३८
१२३ **मराठी भाषा : सध्यस्थिती आणि रोजगाराच्या संधी** / प्रा. डॉ. अशोक शेलार ............ ३४१
१२४ **मराठी विज्ञान कथात्मक साहित्यातील प्रयोगशीलता** / प्रा. एस. बी. डफळापूरकर ............ ३४४
१२५ **मराठी साहित्याच्या आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या दिशा** / प्रा. डॉ. सविता सुनिल केंजळे............ ३४६
१२६ **'भिवा फरारी' या कादंबरीचा समाजशास्त्रीय अभ्यास** / प्रा. डॉ. मनोज बापुसाहेब तेलोरे ............ ३४८
१२७ **मराठीतील आदिबंध** / सुनिता दुधाट, मार्गदर्शक : डॉ. माहेश्वरी गावीत ............ ३५१
१२८ **मराठीतील निसर्गविषयक साहित्य** / डॉ. प्रदीप यशवंत पाटील ............ ३५३
१२९ **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय : आंतरविद्याशाखीय संदर्भ** / डॉ. प्रवीण लोंढे ............ ३५६
१३० **मानवी विकास आणि भाषा** / डॉ. सायली आचार्य ............ ३६०
१३१ **जागतिकीकरण आणि मराठी भाषा** / प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ............ ३६३
१३२ **लोकगीतातील स्त्रियांची भाषा** / प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर ............ ३६६
१३३ **लोकतत्त्वीय अभ्यासपद्धती : स्वरूप आणि निकषव्यवस्था** / डॉ. आप्पासो आनंदा बुडके ............ ३६९
१३४ **लोकदैवतांविषयक मौखिक साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास** / डॉ. सदाशिव पाटील............ ३७२
१३५ **वचनसाहित्य आणि संविधानिक मूल्ये** / प्रा. प्रकाश बाळू नाईक ............ ३७५
१३६ **वाङ्मयीन संस्कृती** / सौ. उज्वला सुनिल लांडगे ............ ३७८
१३७ **विद्रोहाची-परिवर्तनाची भाषा** / डॉ. विजयकुमार रामदास घोडके ............ ३८०
१३८ **वैचारिक साहित्याचे स्वरूप** / डॉ. शशिकला भीमराव रणदिवे ............ ३८३



ISSN No. 2319-6025

# मराठीतील निसर्गविषयक साहित्य

**डॉ. प्रदीप यशवंत पाटील**
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना**

निसर्ग आणि मानव यांचे परस्परावलंबी दृढसंबंध असल्यामुळे सातत्याने प्राचीन साहित्यापासून अर्वाचीन साहित्यापर्यंत कवी, लेखकांनी आपल्या कथा, कविता, कादंबऱ्या, नाटक, प्रवासवर्णनपर साहित्यप्रकारांमधून निसर्गाचे सुंदर, रमणीय, मनोहारी, वेधक असे चित्रण केले आहे. याचबरोबर निसर्गाच्या सान्निध्यात आकार घेणारे मानवी जीवन, निसर्गातून उदयास आलेली संस्कृती, निसर्गाचा सामाजिक जीवनावर पडणारा प्रभाव या प्रमुख घटकांचा निसर्गविषयक साहित्यात समावेश होतो. याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**संतसाहित्य आणि निसर्गचित्रण**

संतसाहित्यातून नैतिक आणि तात्त्विक स्वरूपाचे निसर्गाचे चित्रण आलेले आहे. उदाहरणार्थ, 'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती.' संत ज्ञानेश्वरांच्या या अभंगरचनेत निसर्गाचे चित्रण येते; पण ते तात्त्विक पातळीवरून येते. याचबरोबर संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथातून आंबा, शरद ऋतू, शितल चांदणे, चकोर पक्षी, कावळा, भ्रमर, कस्तुरी, कमळ अशा अनेक निसर्गातील प्रतिमांचा वापर आला आहे. या सर्व प्रतिमांतून संत ज्ञानेश्वर इंद्रियगोचर अनुभवाची अनुभूती देतात. संत तुकाराम यांनी आपल्या? 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती' या अभंगात निसर्ग आणि माणूस यांच्यातील सहसंबंध स्पष्ट केला आहे. संत तुकारामांनी आपल्या अनेक अभंगात वृक्ष, फुले, वनस्पती, फळे, पक्षी, प्राणी, पंचमहाभूते, आकाशातील ग्रह, नक्षत्र अशी विविध प्रकारची निसर्गप्रतिमाने वापरली आहेत. तर समर्थ रामदास यांच्या अभंगातून चंद्रचकोर, सुवर्णपरीस, चेतनाचिंतामणी, कल्पतरू, कामधेनु, अमृत आणि पियुष इत्यादी निसर्गातील घटकांचे विश्लेषण आलेले आहे.

**पंडिती व शाहिरी साहित्य आणि निसर्गचित्रण**

पंडिती परंपरेतील मुक्तेश्वर यांच्या साहित्यांमधून निसर्गजाणिवा व्यक्त झाल्या आहेत. त्यांचा 'भारतीय पर्व' हा ग्रंथ त्यादृष्टीने लक्षात घेता येईल. या ग्रंथात आलेल्या आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तिक या पाच पर्वामध्ये निसर्गातील अनेक घटकांचे वर्णन आले आहे. परंतु त्यांच्या निसर्गवर्णनात अनुभूतीचा प्रत्यय येत नाही. रघुनाथ पंडित यांच्या 'गजेंद्रमोक्ष', 'दमयंती स्वयंवर' यांसारख्या ग्रंथामधून निसर्गप्रतिमा आलेल्या आहेत. मोरोपंतांनी पन्हाळा गडावरील वास्तव्यात लिहिलेल्या 'कुशलवोपाख्यान' या ग्रंथात निसर्गाचे चित्रण आलेले आहे, तर शाहिरी परंपरेतील अनंत फंदी, राम जोशी, सगनभाऊ यांच्या शाहिरी वाङ्मयात निसर्गवर्णने आलेली आहेत. परंतु ही निसर्गवर्णने मूळ आशयाला बळकट करण्यासाठी आली आहेत, शुद्ध निसर्गप्रेम यातून दिसत नाही.

**लोकसाहित्य आणि निसर्गचित्रण**

मराठी साहित्यातील लोकसाहित्याला तर नैसर्गिक पर्यावरणाचे पारंपरिक अधिष्ठान आहे. मौखिक परंपरेतून प्रवाहित असणाऱ्या लोककथा, लोकगीते, लोकसंगीत, लोकनृत्य, परंपरागत मिथके, प्राणीकथा यांमधून साधारणपणे निसर्गाचे पार्थिव स्वरूप, त्यातील प्राणीसृष्टी, वनस्पतीसृष्टी यासंबंधीचे संवेदन प्रकट झाले आहे. यातून निसर्गाचे भान असलेले दिसते. लावणी, भारुड, गोंधळादरम्यान गायली जाणारी गाणी, भोंडल्याची गाणी, वासुदेवाची गाणी, पोतराजची गाणी, भलरी गीते, आदिवासी गीते, मोटेवरची गाणी, लग्नाची गाणी, कोजागिरीची गाणी, पावसाची गाणी, गवळणी, जात्यावरची गाणी यांमधून अनेक निसर्गप्रतिमा आणि निसर्गजाणिवा व्यक्त झाल्या आहेत. तसेच हस्तकला कथा, जादूकथा, खेळकथा, पौराणिक कथा, कोडेकथा, दंतकथा, आत्मा कथा, आख्यायिका यांसारख्या लोककथांमधूनसुद्धा निसर्गाचे मुक्तपणे चित्रण आलेले आहे. उदाहरणार्थ, डॉ. सरोजिनी बाबर यांच्या 'निरशा दुधाची घागर' या ग्रंथातील अनेक लोकगीतांमधून हे निसर्गाचे भान प्रतिबिंबित होताना दिसते. एकूणच मराठी लोकसंस्कृतीने नैसर्गिक पर्यावरणाशी एक प्रकारचे जैविक नाते जोपासले आहे.

**आधुनिक कवितेतील निसर्गचित्रण**

आधुनिक मराठी कवितेच्या आरंभापासून निसर्गविषयक जाणिवा प्रकट झालेल्या आहेत. आधुनिक मराठी कवितेचे जनक असलेले केशवसुत उर्फ कृष्णाजी केशव दामले यांच्या 'तुतारी', 'झपुर्झा', 'हरपलेले श्रेय', 'गोफण', 'मूर्तिभंजन' यांसारख्या कवितांमधून निसर्गप्रतिमा आलेल्या आहेत. तर बालकवी उर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना निसर्गकवी म्हणून ओळखले जाते.

आधुनिक कवितेच्या संदर्भात बालकवींना नैसर्गिक पर्यावरणाचे अग्रदूत मानावे लागेल. त्यांच्या अनेक कवितांमधून निसर्गप्रतिमा ओतप्रोत भरलेल्या आहेत. त्यांच्या 'श्रावणमास', 'फुलराणी', 'औदुंबर', 'निर्झरास', 'बालविहंग', 'पारवा' इत्यादी कवितांचा यासंदर्भाने उल्लेख करता येईल. या सर्व कवितांमध्ये निसर्गाचा आविष्कार अत्यंत तरल पद्धतीने आला आहे.

गोविंदाग्रज उर्फ राम गणेश गडकरी यांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेत वृक्ष, वेली, मुसळधार पाऊस, झुडुपे, मैदान, माती, मेघ, वीज, दगड, कल्पवृक्ष, वटवृक्ष, गगन, कळ्या यांसारखे नैसर्गिक घटक डोकावताना दिसतात. तर कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांच्या 'मराठीपण' या कवितेत निसर्गातील प्रतिमांचा वापर आलेला आहे. तसेच त्यांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत निसर्गातील पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारांगण या घटकांचा उल्लेख आलेला आहे.

विंदा करंदीकर उर्फ गोविंद विनायक करंदीकर यांच्या 'देणाऱ्याने देत जावे' या कवितेत निसर्गातील माळरान, सह्याद्रीचा कडा, ढग, दर्या, भीमा नदी यांसारखे संदर्भ येतात. माधव ज्युलियन यांच्या 'संगमोत्सुक डोह' या कवितेत वादळ, वारा, रेताड पात्रे, ढग, पहाट, रवी, तारा, अंबर, मेघ, तोरण, वैशाख ऋतु, नदी यांसारख्या निसर्गप्रतिमा आणि निसर्गातील घटक येतात. बा. सी. मर्ढेकर यांच्या 'अजून येतो वास फुलांना' आणि 'पिपात मेले ओल्या उंदीर' या कवितांमध्ये फुले, माती, बुंदा, बकरी, पाला, उंदीर यांसारखे निसर्गातील घटक येतात.

चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या 'जाईन दूर गावा', 'तू तेव्हा तशी', 'सप्रेम द्या निरोप', 'आसवांचा येतो वास' यांसारख्या कवितांमध्ये निसर्गाच्या सौंदर्याचे वर्णन आलेले आहे. तर बा. भ. बोरकर यांच्या 'जपानी रमलाची रात्र' या कवितेत वीज, फुलपाखरू, चांदणे, माड, श्वान, नागिण, पुष्पवृष्टी, मासे, नौका यांसारखे नैसर्गिक घटक येतात. त्यांच्या 'सरीवर सरी आल्या गं' आणि 'गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले' यांही कवितांमधून निसर्गाचे चित्रण आले आहे. मंगेश पाडगावकर यांच्या 'तू असतीस तर', 'छोरी', 'अशी पाखरे येती', 'अफाट आकाश' यांसारख्या कवितांमधून कवीने निसर्गाचा घेतलेला अनुभव व्यक्त केला आहे. तर ना. धों. महानोर यांच्या 'रानातील कविता' या कवितासंग्रहात रानाचे सौंदर्य, निसर्गाचे वेगळेपण, रान आणि माणूस यांच्यातील नात्यावर भाष्य केलेले आहे. तसेच अरुण कोलटकर यांची 'सर्पसत्र' ही कविता निसर्गकविता म्हणून महत्वाची आहे. निसर्गातील अनेक घटकांचा त्यांनी आपल्या कवितेत समावेश केला आहे.

### कथात्म साहित्य आणि निसर्गचित्रण

कवितेबरोबरच कथा आणि तत्सम वाङ्मयप्रकारातून निसर्गविषयक जाणिवा प्रकट झालेल्या आहेत. अरविंद ... यांच्या 'गहिरं', 'आदिमाया', 'माहेर' यांसारख्या कथांमध्ये ... पाणी, प्राणवायू, खनिजे, चिखल, अणुरेणु यांसारख्या ... घटकांचा आशयासाठी वापर केलेला आहे. अरविंद ... यांच्या कथांतून निसर्गाचे केलेले वाचन स्पष्टपणे ... व्यंकटेश माडगुळकर यांनी 'बनगरवाडी' या कादंबरीत ... आणि निसर्ग यांच्यातील परस्परसंबंधांवर भाष्य केले आहे. ... या कादंबरीतून खेडेगावातील निसर्गाचे अप्रतिम चित्रण ... आहे. तसेच 'माणदेशी माणसं' या कथेत माणसांबरोबरच ... निसर्गाच्या छायेत राहातात, त्या निसर्गाचेही बारकाईने ... केलेले आहे. त्यांनी 'सत्तांतर' या कथासंग्रहात प्राण्यांचे ... अधोरेखित केले आहे.

दुर्गा भागवत यांनी 'ऋतुचक्र' या ग्रंथात ऋतूंची ... आदर्शीकृत, अलंकारिक वर्णने केली आहेत. निसर्ग... लेखनदृष्टीला संपन्न करणारे, नवी दृष्टी देणारे व नवे ... हे चित्रण आहे. निसर्गवाचनाची एक भाषा, शब्दसंग्रह, ... व शैली 'ऋतुचक्र' या ग्रंथाने दिल्याचे रा. ग. जाधव ... तर आनंद यादव यांची 'माऊली' ही कथा निसर्गभान ... आहे. मांजर हे एक पाळीव प्राणी, पण मांजराला ... अर्थात माऊलीच्या रूपात पाहाण्याचे निसर्गभान, ... ग्रंथाने दिले आहे.

मारुती चितमपल्ली यांनी मानवी जीवनातील निसर्गाचे ... माणूस आणि निसर्ग यांच्यातील नाते अधोरेखित ... साहित्याला नैसर्गिक दृष्टिकोन देऊन साहित्याचे दालन ... आहे. त्यांनी निसर्ग जवळून अनुभवला आहे. निसर्गातील ... वन्यप्राणी, पशुपक्षी, त्यांच्या प्रजाती यांचे सूक्ष्मनिरीक्षण ... मराठी साहित्यात निसर्गविषयक लेखनाची महत्त्वपूर्ण ... आहे. त्यांनी 'घरट्यापलीकडे' (१९९५), 'पक्षी जाय ... (१९८३), 'रातवा' (१९९३), 'रानवाटा' (१९९१), ... (२००४), 'जंगलांची दुनिया' (२००२) या ग्रंथांतून ... बदलांचे, घनदाट वनराईचे रम्य वर्णन, ऋतुमानाप्रमाणे ... पशुपक्ष्यांचे जीवन, फुला-पानां-फळांचे सौंदर्य, ... देखावे, पक्षांची गुंजारव, वातावरणातील बदलांचे ... निसर्गातील विविध घटकांवर होणारे परिणाम चित्रित केले ...

गो. नि. दांडेकर यांच्या 'शितू', 'पवनाकाठचा धोंडी', 'पडघवली' यांसारख्या कादंबऱ्यांमधून निसर्गाचे चित्रण ... आहे. तर सुरेश शिंदे यांची 'सर्ज्या' ही बैलांवर ...



ISSN No. 2319-...

...री कादंबरी निसर्गविषयक साहित्यात मोलाची भर ...री आहे. माणूस आणि प्राणी यांच्यातील जिव्हाळ्याचे ... सदर कादंबरीत व्यक्त झाले आहे. तसेच शरदिनी डहाणूकर ... निसर्गविषयक लेखनात मौलिक भर घातली आहे. त्यांच्या ...ची थाळी', 'फुलवा', 'वृक्षगान', 'हिरवाई', 'सगेसोयरे' ...च्या ग्रंथातून निसर्गाचे चित्रण आलेले आहे. अरुण शेवते ... संपादित केलेल्या 'निसर्गाच्या छायेत' या ग्रंथात ...विषयक अनुभवांवर आधारित ३९ लेखकांनी लिहिलेल्या ...चा समावेश आहे. हे सर्व लेख वृक्षवल्ली, पशुपक्षी, नदी, ..., डोंगर, दऱ्या, जंगल यांवर आधारित असून ...विषयक संवेदना विकसित करणारे आहेत. तर सलीम ... मुल्ला यांनी निसर्गात भटकंती करताना आलेले ...पूर्ण, कुतूहल वाढवणारे, नवलाईचे, काहीसे चमत्कारिक ... आपल्या ग्रंथांतून, कवितांमधून, बालकथांमधून मांडलेले .... या संदर्भात त्यांची 'जंगल खजिन्याचा शोध', 'ऋतूफेरा' ... पुस्तके फार महत्त्वाची आहेत. तसेच कृष्णमेघ कुंटे यांचे ... रानवेड्याची शोधयात्रा' हे ललित गद्यरूपी पुस्तक ...वाचनाची वेगळी दृष्टी देणारे आहे. मदुमलाईच्या ...तील हत्तींचा अभ्यास करता करता त्या जंगलातील ... अनुभवपर चित्रण या पुस्तकात आले आहे. एकूणच ... साहित्यात निसर्गविषयक लेखनप्रकार सर्वच लेखकांनी ... आहे, असे म्हणता येत नाही. तरीही निसर्गाने अनेक ..., लेखक, कलाकार आणि लोकांसाठी प्रेरणा देण्याचे ... केले आहे. निसर्गाशी तादात्म्य पावून निव्वळ निसर्गाच्या ..., निसर्गाच्या अमर्याद स्वरूपाचे, निसर्गातील अनेक ..., निसर्गाच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे चित्रण ... लेखक, कवी करीत आहेत, असे म्हणता येईल.

... मराठीमध्ये निसर्गविषयक लेखन वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. ... आणि माणूस यांच्यातील सहसंबंध लक्षात घेतल्यास ... निसर्गावरील अवलंबन सहजपणे लक्षात येते. प्राचीन ... माणूस निसर्गाच्या सान्निध्यात गुण्यागोविंदाने, ... राहात आला आहे. निसर्गामध्ये पृथ्वी, आकाश, ..., अग्नी आणि वायू या पंचमहाभूतांचा समावेश होतो. या ... माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान आहे. माणसाची ... काही प्रगती झाली आहे, ती या नैसर्गिक घटकांच्या ...मुळेच. मानवाची बोलीभाषा, संस्कृती, सामाजिक रूढी, ... सर्वच निसर्गाशी निगडित असतात. अशा निसर्गाचे ... निसर्गातील पशुपक्षी, प्राणी, वनस्पती, झाडे, पाने, ..., आकाश, समुद्र, डोंगर, दऱ्या यांसारख्या घटकांचे ... साहित्यातून येते. निसर्गाशी तादात्म्य पावून सूक्ष्म निसर्गवाचन करून इंद्रियगोचर अनुभव साहित्यातून येऊ लागले. यालाच निसर्गविषयक साहित्य असे म्हटले जाते. निसर्गविषयक साहित्यात माणूस आणि निसर्ग यांच्यातील संघर्ष न येता निसर्गाची आणि त्यातील घटकांची अनुभवपर माहिती अभिप्रेत आहे. निसर्गविषयक साहित्याची परंपरा शोधली असता संतसाहित्यातूनसुद्धा निसर्गलेखन आलेले आढळते. पंडिती, शाहिरी साहित्यातून, लोकसाहित्यातून, अर्वाचीन साहित्यातून निसर्गविषयक लेखन आलेले आहे. यांमधून उत्कट निसर्गप्रेम जाणवते. निसर्ग हा माणसाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे, पण जेव्हापासून उद्योग आणि विज्ञान हे माणसाच्या जीवनात प्रविष्ट झाले आहे, तेव्हापासून निसर्गचक्र बदलू लागले आहे. असे असले तरी निसर्गाच्या सान्निध्यात माणसाला आनंद मिळतो, समाधान वाटते. आजच्या धकाधकीच्या काळात निसर्गच माणसाला साथसोबत करतो. त्यामुळे निसर्गवाचनाची दृष्टी विकसित होणे गरजेचे आहे.

## निष्कर्ष

माणूस हा निसर्गाचे अपत्य आहे आणि माणूस साहित्याचा विषय आहे. त्यामुळे कोणतेही साहित्य नैसर्गिक पर्यावरणापासून अलिप्त राहू शकत नाही.

पर्यावरणीय साहित्य आणि निसर्गविषयक साहित्य या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत.

निसर्गविषयक साहित्यात निसर्गाचे भान आणि संवेदन जपत निसर्गाची अनुभवपर माहिती पुरविली जाते. तर पर्यावरणीय साहित्यात माणूस आणि निसर्ग यांच्यातील जैविक अधिवास व त्यातील संघर्ष अभिव्यक्त होतो.

स्वातंत्र्योत्तर काळात निसर्गविषयक साहित्य विशेषत्वाने आलेले दिसते.

## संदर्भ


१) कुलकर्णी दिलीप, 'निसर्गायण', राजहंस प्रकाशन, पुणे, (१९९२).

२) चितमपल्ली मारुती, 'चैत्रपालवी', साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, (२००४).

३) जाधव रा. ग., 'पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य', स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे, (१९९६).

४) डहाके वसंत आबाजी, 'मराठी समीक्षेची सद्यस्थिती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, (२०११).

५) देऊळगावकर अतुल, 'बखर पर्यावरणाची', मौज प्रकाशन गृह, मुंबई, (२००६).

६) शेवते अरुण (संपादित), 'निसर्गाच्या छायेत', लोकवाङ्मय गृह, मुंबई, (२०१४).


◆◆◆